# राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर

## कंत्राटी पदभरती जाहिरात दिनांक : २२ /१०/२०२२

## अर्ज कालावधी दि.२७/१०/२०२२ ते दि.०७/११/२०२२

राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर अंतर्गत खालील प्रमाणे कंत्राटी पद भरती करीता अर्ज मागविणेत येत आहेत.

| पदाचेनाव | सामाजिक आरक्षण | एकुण भरावयाची पदसंख्या | वयोमर्यादा | शैक्षणिक अर्हता | दरमहा एकत्रित मानधन | ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| भिषक (फिजीशियन) | विशेष तज्ञ पदासाठी सामाजिक आरक्षण लागु नाही | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | MD Medicine / DNB | रु.७५०००/- | सेवा रुग्णालय क.बावडा |
| डेंटल सर्जन | अ.जा - १<br>अ.ज. - १<br>इ.मा.व. - १<br>खुला - १ | ४ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | MDS / BDS<br>For BDS 2 Years Experience of Minimum 10 Chair Hospital | रु.३००००/- | ग्रामीण रुग्णालय मलकापुर - १<br>आजरा - १<br>गारगोटी - १<br>चंदगड - १ |
| डेंटल हायजिनिस्ट | खुला - १ | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | 12th Science Pass + Diploma in Dental Hygienist Course, Registration with the Dental Council | रु.१७०००/- | सेवा रुग्णालय क.बावडा |
| डेंटल असिस्टंट | अ.जा - १ | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | १२ वी उत्तीर्ण + डेंटल क्लिनिक १ वर्ष शासकीय संस्था अनुभव | रु.१५८००/- | सेवा रुग्णालय क.बावडा |
| भुलतज्ञ | विशेष तज्ञ पदासाठी सामाजिक आरक्षण लागु नाही | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | MD Anesthetics / DA / DNB | रु.७५०००/- | राजर्षी छ.शाहु महाराज वैद्यकीय महाविद्यालय - १ |
| वैद्यकीय अधिकारी (एमबीबीएस) | अ.जा - २<br>अ.ज. - १<br>वि.जा.अ. - १<br>भ.ज.(ब) - १<br>भ.ज.(क) - १<br>भ.ज.(ड) - १<br>इ.मा.व. - ५<br>आ.दु.घ - ३<br>खुला - ५ | २० | वयोमर्यादा ७० वर्षे | एमबीबीएस उत्तीर्ण | रु.६००००/- | उपजिल्हा रुग्णालय, ग्रामीण रुग्णालय व राजर्षी छ.शाहु महाराज वैद्यकीय महाविद्यालय |
| लेखापाल | वि.जा.अ. - १ | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | १. बीकॉम टॅली उत्तीर्ण इआरपी९<br>२. एमएससीआयटी<br>३. मराठी ३० शप्रमी व<br>४. इंग्रजी ४० शप्रमी | रु.१८०००/- | एनएचएम लेखा कक्ष जिल्हा परिषद कोल्हापूर |
| सामाजिक कार्यकर्ता | खुला - १ | १ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | एमएसडब्ल्यु उत्तीर्ण | रु.२८०००/- | सेवा रुग्णालय क.बावडा |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | अ.जा - १<br>अ.ज. - २ | ३ | वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे | डीएमएलटी उत्तीर्ण | रु.१७०००/- | ग्रामीण रुग्णालय मलकापुर - १<br>सेवा रुग्णालय क.बावडा - १<br>उपजिल्हा रुग्णालय कोडोली - १ |

# सर्वसाधारण सुचना

१)उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असून नियुक्ती ही ११ महिन्याची राहील.

२)जाहिरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पदे आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही. तसेच या पदासाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही. तसेच अर्जदाराला शासकिय नियमित सेवेत सामावून घेणे किंवा शासना मार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबधी दावा करण्याचा अधिकारी राहणार नाही.

३)अर्जदार हा संबधित पदासाठी शारीरिक व मानसिक दृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदारा विरुध्द कोणतेही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४)जाहिराती मधील रिक्त पदांच्या संख्येत बदल होऊ शकतो तसेच रिक्त ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो. याबाबतचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.कोल्हापूर यांनी राखुन ठेवले आहेत.

५)केवळ शासकीय अनुभव ग्राहय धरणेत येईल.

६) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्रउमेदवारांची यादी, अंतिम निवड यादी तसेच वेळोवेळी देणेत येणाऱ्या सुचना इ. जिल्हा परिषद कोल्हापूरच्या (www.zpkolhapur.gov.in) संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करणेत येईल. याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारां सोबत केला जाणार नाही.

७) निवड यादीतील गुणानुक्रमांकाचे आधारे प्राधान्य क्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कुठल्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवारांची निवड रदद करण्यात येईल.

८) जाहिरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा खुल्या प्रवर्गासाठी ३८ वर्षे व मागासवर्ग प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील व एम.बी.बी.एस. यांची वयोमर्यादा ७० वर्षेराहील. वय वर्षे ६० नंतर प्रत्येकवर्षी जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडून शारीरीक दृष्टया पात्र असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे.

९) नमुद केलेल्या प्रवर्गाचे उमेदवार प्राप्त न झालेस गुणानुक्रमांकानुसार उमेदवारांची तात्पूरत्या स्वरुपात निवड करण्यात येईल.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रियाही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार अर्जाची छाननी करुन गुणानुक्रमे यादी तया रकरण्यात येऊन गुणवत्तेनुसारनिवड करण्यात येईल.

११) उमेदवारास कंत्राटी कालावधीत सोईनूसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) उपरोक्त पदांकरीता तत्सम कौन्सिलचे अद्ययावत रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील. अन्यथा उमेदवारांस मुलाखतीस अपात्र ठरविले जाईल.

१३) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रदद करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.मुख्य कार्यकारी अधिकरी यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत.याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१४) **इच्छुक उमेदवारांचे विहितन मुन्यातील अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकित सत्य प्रतीसह आपले अर्ज राष्ट्रीय आरोग्य अभियान कक्ष, २ रामजला, आरोग्य विभाग, जिल्हा परिषद कोल्हापूर येथे दि.२७/१०/२०२२ ते दि.०७/११/२०२२ रोजीपर्यंत (कार्यालयीन सुट्टी वगळता) कार्यालयीन वेळेत सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० वा.पर्यंत स्विकारण्यात येतील.**

१५) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर नियुक्ती दिलेले उमेदवार विहित कालावधीत हजर झाले नाही अथवा एक वर्षाच्या आत एखादया ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमूळे पद रिक्त झालेस प्रतीक्षा यादीवरील उमेदवारास नियुक्ती आदेश दिले जाईल.

१६) खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनी **रु.१५०/-** व मागासवर्गीय प्रवर्गा करीता **रु.१००/- चा** डिमांड ड्राप्ट (DD)जोडणे आवश्यक / अनिवार्य आहे व डिमांड ड्राप्टच्या मागे स्वतःचे नाव व पद स्वहस्ताक्षरात लिहावे, सदरचा डिमांडड्राप्ट (DD)

**"District Integrated Health & Family Welfare Society, Kolhapur"**

**(ICICI Bank Branch Rajarampuri Kolhapur IFSC Code – ICIC0000166)** या नावाने देय असलेला असावा. चेक अथवा डीडी काढणे साठी बॅंकेत पैसे भरलेची स्लिप ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

१७)परिपुर्ण अर्ज सादर करणेची जबाबदारी संबधित उमेदवाराची असुन अपुर्ण अर्ज ग्राहय धरला जाणार नाही, अपात्र करणेत येईल याची नोंद घ्यावी.

१८) सदरहू भरती प्रक्रिये करीता अर्ज सादर करणेची अंतिम मुदत दि.०७/११/२०२२ अखेर राहणार असून तदनंतर अर्जाची छाननी, पात्र व अपात्र उमेदवारांची यादी प्रसिध्दी, अंतिम निवड यादी प्रसिध्द करणे, हरकती / आक्षेप प्राप्त करुन घेणे व त्या निकाली काढणे आदी रीतसर शासनाच्या तसेच राष्ट्रीय आरोग्य अभियान कडील प्राप्त मार्गदर्शक सुचनां नुसार भरती प्रक्रिया पार पाडुन निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश देणेत येईल. याबाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या https://www.zpkolhapur.gov.in/barti-2019/ या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहिरात दिली जाणार नाही. त्याकरीता उमेदवार राष्ट्रीय आरोग्य अभियान कार्यालय कोल्हापूर कार्यालयाकडील ०२३१-.२६५६६१७ या क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधु शकतात.

** खालील प्रमाणे आवश्यक कागदपत्रांच्या साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती अर्जा सोबतजो डाव्यात.

१)शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका २)जातीचे प्रमाणपत्र ३)शाळा सोडल्याचा / जन्म तारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) महाराष्ट्र कौन्सिलच वैध रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

अध्यक्ष
निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, कोल्हापूर

# राष्ट्रीय आरोग्य अभियान कोल्हापूर

जाहिरात दिनांक : २२/१०/२०२२

अर्ज कालावधी दि.२७/१०/२०२२ ते दि.०७/११/२०२२

..............................या पदासाठी अर्ज

पासपोर्ट
आकाराचा
उमेदवाराचा
नजीकचा
साक्षांकित फोटो

(फोटोवर उमेदवाराची स्वाक्षरी)

प्रति,
मा.मुख्य कार्यकारी अधिकारीसो,
जिल्हा परिषद कोल्हापूर

| संपूर्ण नाव | मराठी | इंग्रजी (कॅपीटल लेटर) |
|---|---|---|
| १) आडनाव | .................. | .............................. |
| २) स्वतः चे नाव | .................. | .............................. |
| ३) वडिलांचे /पतीचे नाव | .................. | .............................. |
| ४) आईचे नाव | .................. | .............................. |

पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोड सहीत

...................................................................

...................................................................

.................................................पिन कोड -...........

मोबाईल क्रमांक ................................ ई मेल आयडी-................................

५) जन्म तारीख

| तारीख | महिना | वर्ष |
|---|---|---|
| | | |

६) दि. ३०/०९/२०२२ रोजीचे वय

| वर्षे | महिने | दिवस |
|---|---|---|
| | | |

७) कोणत्या प्रवर्गासाठी अर्ज केलेला आहे त्याप्रमाणे (√) अशी खुन करावी.

| अ.जा. | अ.ज | वि.जा.अ | भज (ब) | भज (क) | भज (ड) | वि.मा.प्र. | इ.मा.व | एसईबीसी | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | SEBC | EWS | Open |
| | | | | | | | | | | |

८) शैक्षणिक अर्हता :

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | विदयापीठ/ मंडळाचे नाव | परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |
| ६ | | | | | |

९) अनुभव

| अ. क्र. | संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण कालावधी दिवस महिने वर्ष |
|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | |
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |

१०) माझे विरुध्द न्याय प्रविष्ठ प्रकरण, फौजदारी, शिस्तभंग विषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालू आहे / नाही असल्यास थोडक्यात तपशिल ......................................

.........................................................................................................

११) अर्जा सोबत खालील (छायांकित) सत्य प्रती जोडलेल्या आहेत.

१) शैक्षणिक अर्हते बाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका (बंधनकारक) २) जातीचे प्रमाणपत्र ३) शाळा सोडल्याचा /जन्मतारखेचा दाखला ४) प्रमाणित केलेले केवळ शासकीय अनुभव प्रमाणपत्रे ५) पासपोर्ट आकाराचा फोटो ६) महाराष्ट्र कौन्सिलचे वैध रजिस्ट्रेशन प्रमाणपत्र.

१२) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? होय/ नाही.

मी असे प्रमाणित करतो /करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण : अर्जदाराची सही :

दिनांक : अर्जदाराचे नाव : (..................................................)